**( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )**

क्र: पोमसं /८अ/नि.सू -२०१५-१६(उ.श्रे.ल.ले. ते स्वी.स.)/जिल्हा/३८/२०१६ मुंबई , दिनांक : २२/०६/२०१७

**वाचा :-** या कार्यालयाचे समक्रमांकित, दिनांक २९/०५/२०१७ चे आदेश.

## -:आदेश:-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या जिल्हा लिपीक संवर्गातील उच्च श्रेणी लघुलेखक श्री संजय प्रितमराव मोहोड, नेमणूक पोलीस आयुक्त, नागपूर शहर कार्यालय यांना या कार्यालयाचे समक्रमांकित, दिनांक २५.०५.२०१७ च्या आदेशांन्वये स्वीय सहाय्यक या पदावर पदोन्नती देऊन त्यांची नेमणूक पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर कार्यालयामध्ये करण्यात आली होती.

२. श्री मोहोड यांनी स्वत:च्या वैद्यकिय कारणास्तव पोलीस आयुक्त, औरंगाबाद कार्यालया ऐवजी पोलीस अधीक्षक, चंद्रपूर कार्यालय येथे पदोन्नतीवर बदली मिळणेबाबत विनंती केली आहे. तथापि, पोलीस अधीक्षक, चंद्रपूर कार्यालयामध्ये अन्य स्वीय सहाय्यकाची बदली करण्यात आली असल्यामुळे सध्या तेथे स्वीय सहाय्यकाचे पद रिक्त नसल्यामुळे नागरी सेवा मंडळाने त्यांची सदरची विनंती अमान्य केली आहे.

३. श्री मोहोड यांनी त्यांच्या दिनांक ९.६.२०१७ चे विनंती अर्जान्वये आणखी असे नमूद केले आहे की, त्यांची पोलीस आयुक्त, औरंगाबाद ऐवजी पोलीस अधीक्षक, चंद्रपूर येथे पदोन्नतीवर नेमणूक न झाल्यास, ते पदोन्नती नाकारीत असून पदोन्नतीचे आदेश रद्य करावेत.

४. सबब, श्री संजय प्रितमराव मोहोड, उच्च श्रेणी लघुलेखक, नेमणूक पोलीस आयुक्त, नागपूर शहर कार्यालय यांनी स्वीय सहाय्यक या पदावरील पदोन्नती नाकारली असल्यामुळे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १२/०९/२०१६ मधील तरतुदीनुसार त्यांचे स्वीय सहाय्यक पदावरील पदोन्नतीचे आदेश याद्वारे रद्द करण्यात येत असून, त्यांचे नांव शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र एसआरव्ही २०१५/प्र.क्र.३०३/का.१२, दिनांक १२/०९/२०१६ मधील तरतुदीनुसार सन २०१६-१७ चे निवडसूचीवरुन वगळण्यात येत आहे. तसेच त्यांचा सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या वर्षाची निवडसूची बनविताना विचार करण्यात येणार नाही.

५. श्री मोहोड यांना कार्यमुक्त केले असले तरी, त्यांनी पदोन्नती नाकारल्याने त्यांची आस्थापना पोलीस आयुक्त, नागपूर शहर कार्यालय अशी राहील.

**सतीश माथुर**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई .

प्रति,

श्री संजय प्रितमराव मोहोड, उच्च श्रेणी लघुलेखक, नेमणूक पो.आ, नागपूर शहर कार्यालय
**( मार्फत : पोलीस आयुक्त, नागपूर शहर )**

प्रत,

पोलीस आयुक्त, नागपूर शहर

२. पोलीस आयुक्त यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी उच्च श्रेणी लघुलेखक श्री संजय प्रितमराव मोहोड यांच्या सेवापुस्तकात पदोन्नती नाकारल्याची नोंद घ्यावी.

विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर
पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर
पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण.
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १०/१२/३६

**(अनुप कुमार सिंह )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.